MHKO100010812022 **संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ३५८/२०२२**

महाराष्ट्र सरकार
//वि//
रमेश शंकर माने.

## न्यायनिर्णय

(निकाल तारीख १८/०१/२०२५)

आरोपी विरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५(ई) अन्वये प्रस्तुतचा खटला दाखल करण्यात आलेला आहे. प्रस्तुतचा खटला संक्षिप्त स्वरुपाचा आहे. प्रस्तुत प्रकरणात साक्षीदारांना वेळोवेळी समन्सची बजावणी होवुन देखील साक्षीदार साक्षीकामी न्यायालयात हजर झालेले नाहीत व अभियोगपक्ष देखील प्रस्तुत साक्षीदारांना न्यायालयात हजर ठेवण्यास असमर्थ ठरलेला आहे. प्रस्तुत प्रकरणात पंच साक्षीदार या दोनच साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आलेली असुन इतर साक्षीदारांची साक्ष अभियोग पक्ष नोंदविण्यास असमर्थ ठरलेला आहे. प्रस्तुत प्रकरणात साक्षीदारांची उपस्थिती वारंवार समन्स काढुन देखील शक्य होत नसल्याने आणि प्रस्तुत प्रकरणात रासायनिक प्रयोगशाळेचा अहवाल आजपावेतो दाखल नसल्याने मी सदर प्रकरण फौजदारी प्रक्रीया संहिता कलम २५८ अन्वये थांबवित असुन त्याप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

०२. अभिलेखावरील उपलब्ध पुरावा आणि गुन्हयाचा तपशिल पाहता, खालीलप्रमाणे प्रश्न अधोरेखित करण्यात आले व त्यावर खालील नमुद करणांसह निष्कर्ष पुढील प्रमाणे देण्यात आला.

| अ.क्र. | प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| **१.** | दिनांक १२/०८/२०२२ रोजी अत्याळ, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर येथे आरोपी एका रबरी काळी ईन्नरमध्ये अंदाजे १२ लिटर गावठी हातभट्टीची दारु, एका कापडी पिशवीमध्ये देशी दारु संत्राच्या १८० मि.ली.च्या २२ सिलबंद बाटल्या व २ काचेचे ग्लास स्वतःजवळ बाळगून त्याची विक्री करीत असताना मिळून आला असे अभियोग पक्ष सिध्द करतो का ? | **नाही.** |

| | | |
|---|---|---|
| २. | आदेश काय ? | **आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येते.** |

## कारणमिमांसा

**प्रश्न क्र.१ साठी -**

०३. अभियोगपक्षाने सदर प्रकरणामध्ये आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्याकरीता फक्त दोनच साक्षीदारांस तपासले व इतर कागदोपत्री पुराव्यांचा आधार घेतला. प्रस्तुत प्रकरणातील पोलीस साक्षीदार व इतर साक्षीदार हे साक्षीकामी न्यायालयात हजर राहु शकले नाहीत व सरकारपक्ष त्यांची साक्ष अभिलेखावर नोंदविण्यास असमर्थ ठरलेला आहे.

०४. अभियोगपक्षातर्फे आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्याकरिता तपासण्यात आलेला पंचनाम्यावरील पंच साक्षीदार क्र.१ भैरु मारुती नाईक व साक्षीदार क्र.२ भिकाजी शिवाप्पा पाटील यांनी त्यांचे पुराव्यादरम्यान दिनांक १२/०८/२०२२ रोजीच्या पंचनाम्यावरील त्यांच्या स्वाक्षरी व्यतिरिक्त इतर संपूर्ण मजकूराचे खंडन केले. त्यांनी त्यांच्या सरतपासात ते पोलीसांसोबत कोठेही गेले नव्हते व त्यांच्या समक्ष कोणताही पंचनामा केला नाही असे कथन केलेले आहे. सदर साक्षीदार अभियोगपक्षास सहकार्य करीत नसल्याने सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी न्यायालयाच्या परवानगीने सदर साक्षीदारांस उलटतपासात विचारता येतील असे सुचक प्रश्न विचारले. परंतु, सदर साक्षीदारांनी ते पोलीसांसोबत पंचनामा करण्यासाठी गेले नव्हता व त्यांच्या समक्ष पंचनामा केल्याची बाब स्पष्टपणे नाकारली आहे. त्यामुळे, सदरचा घटनास्थळ व जप्ती पंचनामा पुराव्यात सिध्द होत नाही.

०५. प्रस्तुत प्रकरणात आरोपी विरुध्द गुन्हा सिध्दतेकामी आवश्यक असलेला रासायनिक विश्लेषण अहवाल या न्यायालयासमोर अभियोगपक्षाने दाखल केलेला नाही. त्याचप्रमाणे आरोपीच्या ताब्यातून सदर मुद्देमाल ज्या पंचासमक्ष जप्त करण्यात आला होता त्या घटनास्थळ व जप्ती पंचनाम्यावरील पंच भैरु नाईक व भिकाजी पाटील यांनी न्यायालयासमोर दिलेल्या त्यांच्या पुराव्यात त्यांच्यासमक्ष आरोपीच्या ताब्यातून एका रबरी काळी ईन्नरमध्ये अंदाजे १२ लिटर गावठी हातभट्टीची दारु, एका कापडी

पिशवीमध्ये देशी दारु संत्राच्या १८० मि.ली.च्या २२ सिलबंद बाटल्या व २ काचेचे ग्लास जप्त करुन त्यामधून रासायनिक विश्लेषणासाठी नमुना काढला होता असे कथन केलेले नाही. त्यामुळे, जप्त मुद्देमाल दारुच होती हे सिध्द झालेले नाही. पंच साक्षीदारांनी घटनास्थळ व जप्ती पंचनामा सिध्द करण्यास उपयोगी अशी साक्ष न्यायालयासमोर न दिल्यामुळे सदरचा घटनास्थळ व जप्ती पंचनामा पुराव्यात सिध्द झालेला नाही. अन्य पुराव्यातून देखील आरोपीच्या ताब्यातून वर नमुद मुद्देमाल मिळून आला हे अभिलेखावर आलेले नाही. सबब, आरोपीच्या कब्ज्यातून सदरचा मुद्देमाल मिळून आला ही बाब सिध्द होऊ शकली नाही.

०६. वरील सर्व कारणांचा विचार करता आरोपी त्याच्या ताब्यात विनापास परवाना एका रबरी काळी ईन्नरमध्ये अंदाजे १२ लिटर गावठी हातभट्टीची दारु, एका कापडी पिशवीमध्ये देशी दारु संत्राच्या १८० मि.ली.च्या २२ सिलबंद बाटल्या व २ काचेचे ग्लास स्वतःजवळ बाळगून त्याची विक्री करीत असताना मिळून आला हे दोषारोप निःसंशयपणे तसेच सबळ पुराव्यानिशी सिध्द करण्यास अभियोगपक्षास अपयश आले आहे या निष्कर्षाप्रत हे न्यायालय आले आहे. परिणामी प्रश्न क्र.१ चे उत्तर 'नकारार्थी' नोंदविण्यात येत आहे.

**<u>प्रश्न क्र.२ साठी</u> -**

०७. वरील विवेंचनेच्या अनुषंगाने प्रश्न क्र.१ चे उत्तर नकारार्थी असल्याने आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. सबब, प्रश्न क्र.२ चे उत्तरार्थ खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

## आ दे श

१. आरोपी **रमेश शंकर माने** यांची महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५(ई) च्या आरोपातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५८ अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीचे जामिन व बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. जप्त मुद्देमाल एका रबरी काळी ईन्नरमध्ये अंदाजे १२ लिटर गावठी हातभट्टीची दारु व देशी दारु संत्राच्या १८० मि.ली.च्या २२ सिलबंद बाटल्या अपील कालावधी समाप्तीनंतर नियमाप्रामाणे योग्य त्या विल्हेवाटीकरीता अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, कोल्हापूर यांचेकडे पाठविण्यात यावा.

४. जप्त मुद्देमाल एक कापडी पिशवी व २ काचेचे ग्लास यांचा अपील कालावधी समाप्तीनंतर जाहिर लिलाव करुन त्याची रक्कम सरकार जमा करणेत यावी.

५. आरोपीने कलम ४३७(अ) फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ अनुसार रक्कम रुपये १५,०००/- (रुपये पंधरा हजार फक्त) चे बंधपत्र देऊन अभियोगपक्षाने सदर प्रकरणात अपील केल्यास त्यात हजर राहण्याची ग्वाही द्यावी.

६. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील रंजना शांतीलाल सुर्यवंशी विरुध्द जयप्रकाश तुलसीराम गुप्ता, क्रिमीनल ॲप्लीकेशन नं.३८०/२०१९ मधील क्रिमीनल अपील (एस.टी) नं.३९०/२०१९ या न्यायनिवाडयामध्ये निर्देशित केलेप्रमाणे या न्यायनिर्णयाची प्रत मा. जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडे सत्वर पाठविण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by
RATHOD SUJIT
Date: 2025.01.20
18:07:10 +0530

**( एस. ए. राठोड )**

गडहिंग्लज.
दिनांकः १८/०१/२०२५.

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.१, गडहिंग्लज.

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of stenographer | R. D. Patil. |
| Name of Court | S. A. Rathod,<br>Jt. CJJD & JMFC, Gadhinglaj. |
| Date of Dictation | 18/01/2025 |
| Order signed by P.O. on | 18/01/2025 |
| Order uploaded on | 20/01/2025 |